दै. महाराष्ट्र टाईम्स, पुणे
शनिवार दि. २६ मे २०१८

त्रिसमुद्रेश्वर...

परंपरा आरमाराची भाग ३

अनिकेत यादव

बालमित्रांनो, आपण मागच्या भागात भारतात राज्य करणाऱ्या सागरी सत्ताधीशांची ओळख करून घेतली. त्यापैकीच एक असणाऱ्या चोळ किंवा चोल राजवंशाची माहिती आपण घेणार आहोत. दहाव्या आणि अकराव्या शतकात चोल राजांनी भारताचा बराचसा सागरी किनारा त्यांच्या वर्चस्वाखाली आणला होता. सागरी व्यापरही त्यांनी बराचसा वाढविला होता. चोलराजांची सत्ता पूर्व, दक्षिण आणि पश्चिम अशा तिन्ही समुद्रांवर असल्याने ते स्वतःला 'त्रिसमुद्रेश्वर' म्हणवून घेत. केवळ दक्षिण भारतातच नाही, तर दक्षिण भारतालगत असलेल्या समुद्री बेटांवर; तसेच मलेशिया, इंडोनेशिया, दक्षिण थायलंडच्या काही भागांवर चोल राजांचे अधिपत्य होते. समुद्रावरून रात्री प्रवास करणाऱ्या जहाजांच्या सुरक्षिततेसाठी आणि दिशा कळावी; यासाठी दीपगृहेही त्यांनी बांधलेली होती. राजराज चोल यांनी प्रबळ नौदलाची निर्मिती करून लंकेवर प्रभुत्व निर्माण केले होते. पुढे राजेंद्र चोल यांनी तर मलाया द्वीपकल्पातील राज्यावर आपली नौसेना पाठवून ते राज्य जिंकले होते. काही बेटांवर त्यांनी आरमारी स्वारीही केली होती. इसवी सन १०२५ मध्ये पहिला राजेंद्र चोल या राजाने सुमात्रा बेटावर समुद्रामार्गे केलेली स्वारी ही भारताच्या नाविक परंपरेतली एक महत्त्वपूर्ण घटना आहे. अकराव्या शतकाच्या उत्तरार्धात दुसरा राजेंद्र चोल यांनी मलेशियातील एक राज्य जिंकून आपला साम्राज्यविस्तार मोठ्या प्रमाणावर केलेला होता. अकराव्या शतकालीत चोलराजे हे आरमाराकडे लक्ष देणारे भारतातले शेवटचे हिंदू राजे होते.

आरमाराचे राजकीय महत्त्व ओळखणाऱ्यांत चोल राजांनंतर ६०० वर्षांनी फक्त छत्रपती शिवाजी महाराज हेच आहेत.